कृष्णा चिंचवले

संचालक मंडळ सदश्य

के १२, गंधर्व नगरी

२८/०७/२०२२

प्रति,

**श्री. समीर पुणेकर,**

**विषय- संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९.०६.२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये माझ्या कडून कुठलेही गैरवर्तन झाले नसल्या बद्धल**

आपले पत्र MCM /२०२२/ ०७/००१

मा. महोदोय ,

**विषयांकित पत्र १९/०६/२०२२ रोजी झालेल्या बैठकीशी सुसंगत नाही.**

माझ्या कडून १९/०६/२०२२ रोजी आचार संहिता भंग झाल्याबद्धल तक्रार केल्याचे आपण १९/०७/२०२२ पत्रान्वये कळवीत आहात .

पत्रात मी सौ. दीक्षित यांच्याशी आरडाओरडा करून बोललात व श्री. पोंक्षे यांना धक्का बुक्की केल्याचे लिहिले आहे.

मी आपणास सांगू इछितो की,

१) श्री. विक्रम यांनी E १२ हि सदनिका श्री. खरे यांच्याकडून खरेदी केली. विक्रम यांनी ह्या सदनिकेवर थकबाकी अस्ताणेसुद्धा प्रशासकांकडून त्यांची दिशाभूलकरून NOC घेतली. व मिटिंग मध्ये अजेंडयाचा विषय नसताने बहुमतावर सदनिकेची थकबाकी न भरता सदनिका ट्रान्सफर करण्याचा विषय मांडला. त्यास मी विरोध प्रकट करून सदर विषयावर मा. DDR साहेबांना पत्र लिहून त्यांच्याकडून अभिप्राय घेण्याचा विषय मांडला. त्यास सौ. दीक्षित यांनी आक्षेप घेतला. त्यावर

**मी सोसायटीचे नुकसान होऊन देणार नाही हे जोरात सांगितले.**

२) मी हे सांगत असताने श्री. पोंक्षे यांनी मागून पाठीत मारून तुझी बॉडी लँग्वेज चांगली नाही असे माझ्या तोंडासमोर येऊन सांगितले. त्यांच्या तोंडाचा वास येत असल्याने तो असह्य झाल्याने मी त्यांना मागे लोटायचा प्रयत्न केला. त्यावर त्यांनी माझ्याच अंगाला पहिला हात लावून मलाच अंगाला हातलावू नका असे धमकावले. त्यावर त्यांला मी हाताने धरून मागे रेटले नाहीतर त्यांचा मला चावायचा प्रयत्न करीत होते. ह्या विषयात फक्त ढकलणे एवढीच क्रिया झाली असून कुठेही बुक्की मारणे , लाथ मारणे, तोंडात मारणे असा प्रयत्न झाला नाही. .

हि वस्तुस्तिथी असताने **आपण लिहिलेले पत्र विसंगत असून ते मी नाकारत आहे.**

**मोठ्याने बोलणे (आरडाओरडा) घटनेच्या कुठल्या कलमानुसार गुन्हा आहे? हे कळवावे, तसेच समोरच्याने काही चूकीचे वर्तन केले असेल तर ऐकणारा व ज्याच्यावर अन्याय होतोय तो चिडणारच व भावना व्यक्त करणारच, अशा वेळी बाकीचे सभासद मूग गिळून गप्प बसतात तर ते अन्यायकर्त्याला ऊत्तेजन व त्याच्या कृत्यात सहभागी होणे ही चूकच करतात, तुमचे सदरपत्र म्हणजे अन्यायाविरूद्ध आवाज ऊठवणार्याची मुस्कटदाबी करणे होय!**

ज्याचा बद्धल आरोप आहेत तो  विक्रम व मला पत्र देणारा जज एकच .

क्रिकेटमधील  बॉलर अम्पायरला खेळाडू बाद झाल्याचे ज्या बॉडीलँग्वेज मध्ये, आरडा ओरडा करून अपील करतो त्यामुळे  आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचे पत्र त्याला मिळते का ??

माझी मुस्कटदाबी करावयाची असल्याने मला माझी बाजू मांडण्याची संधी दिली नाही. मी वारंवार ग्रुपवर सांगूनही मला माझी संधी न देता मला पत्र देण्याची घाई कशासाठी?

याव्यतिरीक्त आपण कुठेही  तक्रार करायला मुखत्यार आहात, पण मी माफी मागणार नाही वा कसलीही हमीदेखिल देणार नाही! कारण मी कुठलीच चूक केलेली नाही. सोसायटीच्या हिताचा विचार केला आहे.

धन्यवाद

कृष्णा चिंचवले  ( संचालक मंडळ सदस्य )